संक्षिप्त

चिपळूण : शहरातील जनसंपर्क कार्यालयात शिवसेनेच्या वर्धापन दिन कार्यक्रमास उपस्थित उबाठा सेनेचे पदाधिकारी, नगरसेवक, शिवसैनिक आदी.

उबाठा गटातर्फे शिवसेनेचा वर्धापन दिन उत्साहात

चिपळूण शहर : येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेतर्फे शिवसेनेचा ६०वा वर्धापन दिन शहरातील जनसंपर्क कार्यालयात झाला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जय भवानी, जय शिवाजी, शिवसेना जिंदाबाद, बाळासाहेब ठाकरे अमर रहे अशा घोषणांनी परिसर भगवामय झाला. शहरप्रमुख सचिन कदम यांनी मनोगत व्यक्त केले. तालुकाप्रमुख बळीराम गुजर यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना शिवसैनिकांना खंबीर राहण्याचे आवाहन केले. यावेळी तालुका संघटक राजू देवळेकर, जिल्हा सोशल मीडिया प्रमुख (दक्षिण रत्नागिरी) सचिन चोरगे, शहर संघटक वैशाली शिंदे, शहर सचिव प्रशांत मुळये, उपशहरप्रमुख तथा न.प.तील गटनेते मिथिलेश (विकी) नरळकर, संजय रेडीज, राजू विखारे, मनोज पांचाळ, विभाग प्रमुख व नगरसेवक संजय गोताड, नगरसेवक अजय भालेकर, विभाग संघटक तृप्ती कासेकर, नगरसेविका वैशाली कदम, ज्येष्ठ शिवसैनिक राजू भागवत, माजी शाखाप्रमुख विनायक वास्कर, सतिश शिंदे, आशिष कदम आदी उपस्थित होते.

चिपळूण : स्वामी मंगल सभागृहात शिवसेनेच्या वर्धापन दिन कार्यक्रमावेळी उपस्थित पदाधिकारी, नगरसेवक, शिवसैनिक आदी.

चिपळुणात शिंदे गटातर्फे शिवसेनेचा वर्धापन दिन उत्साहात

चिपळूण शहर : शिवसेनेचा ६० वा वर्धापन दिन सोहळा शिवसेना (शिंदे गट) चिपळूण तालुका व शहर यांच्यावतीने शहरातील बहादूरशेख नाका येथील स्वामी मंगल सभागृहात उत्साहात झाला. यावेळी शिवसेना महिला आघाडी जिल्हा संघटक रश्मी गोखले, तालुकाप्रमुख तथा उपसभापती संदेश आयरे, शहरप्रमुख तथा नगराध्यक्ष उमेश सकपाळ, महंमद फकीर, महिला शहर संघटक प्राजक्ता टकले, नगर परिषद गटनेते अंकुश आवले, न. प. बांधकाम समिती सभापती कपिल शिर्के, हर्षाली पवार, उपसभापती राणी महाडिक, नगरसेवक विकी लवेकर, उदय जुवळे, गणेश आग्रे, नीलम जाधव, पंचायत समिती सदस्य संजय जावळे, राकेश शिंदे आदी उपस्थित होते.

गणपत कदम यांचे निधन

गुहागर शहर : गुहागर तालुक्यातील बौध्दजन सहकारी संघ पाटपन्हाळे शाखा क्र. 11 चे माजी सल्लागार दिवंगत गणपत भिकू कदम यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. गणपत कदम यांचा गावाच्या सामाजिक शैक्षणिक प्रगतीमध्ये मोलाचा वाटा असायचा. त्यांच्या पश्चात भाऊ, बहीण, मुलगा, मुलगी, जावई, नातवंडे, पत्नी असा मोठा परिवार आहे.

मंडणगडात बळीराजाला अद्याप पावसाची प्रतीक्षा

पारंपरिक पावसाचा अंदाज लावत काही अंशी केलेली शेतीतील पेरणी आता वाया जाण्याची चिंता; दुबार शेतीचे सावट

मंडणगड : पुढारी वृत्तसेवा

मान्सून सक्रिय नसल्याचा प्रभाव आता सर्वसामान्य जीवनमानावर होत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येत आहे. पावसाअभावी मंडणगड तालुक्यातील शेतीची कामे खोळंबली असून, पारंपरिक पावसाचा अंदाज लावत काही अंशी केलेली शेतीतील पेरणी आता वाया जाण्याची चिंता आहे. दरम्यान, तालुक्यातील पाचही धरणांमधील पाण्याची पातळी खालावली असल्याचे पाटबंधारे विभागाकडून सांगण्यात येते. त्यामुळे पाण्याच्या संकटाचे सावट गडद होत असल्याने चिंतातुर बळीराजासह सर्वांचेच डोळे मात्र आता आभाळाकडे लागले आहेत.

तालुक्यात दरवर्षी सरासरी ३५०० ते ४००० मि.मी. पाऊस पडतो. पावसाचे प्रमाण प्रचंड असल्याने धुळवाफ पेरणी केली जाते. मात्र, यावर्षी पावसाने सर्वांचेच अंदाज चुकवत दडी मारल्याने शेतीसह सर्वच क्षेत्रात उदासीनता पाहायला मिळते. तालुक्यात यंदा १०० ते १२५ हेक्टर क्षेत्रावर शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी मनुज जिंदल, पद्धतीने पेरणी केली आहे. आता मात्र या शेतीमध्ये दुबार शेतीचे सावट उभे राहिलेले दिसून येते. तालुका कृषी विभागाच्या प्रतिक्रियेत, या शेतकऱ्यांना शेतीतील रोपांना कृषी अधिकाऱ्यांच्या सूचनांनुसार पंपाच्या सहाय्याने पाणी देण्याचे व उर्वरित शेतकऱ्यांनी पेरणीयोग्य पुरेसा पाऊस पडल्याशिवाय रोपवाटिका न टाकण्याचे आवाहन केले आहे.

मंडणगड : तालुक्यात पेरणी केलेले शेतीक्षेत्र.

पावसाअभावी पाण्याचे संकट गडद होत असताना तालुक्यातील पाचही धरणांची पाणी पातळी खालावली आहे. यातील पंदेरी धरणाचे दुरुस्तीचे काम सुरु असल्याने या धरणातील पाणीसाठा मुळातच कमी आहे. २० जूनच्या पाटबंधारे विभागांच्या आकडेवारीनुसार भोळवली धरणातील पाणी साठा १.०७२ दलघमी इतका म्हणजेच साधारणपणे ३० टक्के इतका आहे. तर तुळशी धरणातील पाणी साठा १.५४६ दघलमी, १०.०९ टक्के व चिंचाळी धरणात २.०३० दलघमी म्हणजेच ३९.१६ टक्के पाणी साठा उपलब्ध आहे. या धरणामुळे सावित्री नदीची उपनदी भारजा नदीचा काहीप्रमाणात पाणीप्रवाह या मोसमातही दिसून येतो. मात्र पावसाची आत्ताची स्थिती पाहता पाण्याचा अपव्यय टाळणे महत्वाचे असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. तालुक्यातील देवाचा डोंगर, कुडूक खुर्द, कोंडगाव या गावांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याने टँकरने पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येत आहे.

सर्वांच्या एकजुटीमुळेच जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघ बळकट होईल

जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघ सभेत अध्यक्ष संजय शिर्के यांचे मत

चिपळूण : पुढारी वृत्तसेवा

जूनअखेरपर्यंत रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व संस्थांनी रत्नागिरी जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघाचे सभासद होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे संघ बळकटीसाठी विविध संस्थांमधील तज्ज्ञ संस्थाचालकांचे मार्गदर्शन मिळेल व अनेक समस्या मार्गी लागतील. कोकणातील शाळा वाचतील, शिक्षण क्षेत्रासाठी कायमस्वरूपी ठोस उपाययोजना करता येईल. सर्वांच्या एकजुटीमुळे रत्नागिरी जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघ बळकट होईल, असे मत संघाचे अध्यक्ष संजय शिर्के यांनी व्यक्त केले.

जिल्ह्यातील संस्था व शाळांच्या विविध शैक्षणिक समस्यांवर ठोस उपाययोजना करण्यासाठी जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघाच्या नवीन कार्यकारिणीची पहिली सभा शुक्रवारी येथील डी.बी.जे. महाविद्यालयात पार पडली. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या सभेत रत्नागिरी जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघाची तालुकानिहाय समन्वय समिती निवडावी व समिती सदस्यांच्या माध्यमातूनच प्रथम तालुक्यातील शाळा व संस्थांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे ठरले. तसेच बदलते नवीन शैक्षणिक धोरण याचा शिक्षण व्यवस्थेवर होणारा परिणाम शासनाच्या धोरणात्मक निर्णयामुळे कायमस्वरूपी बंद होणाऱ्या शाळा यामुळे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील शाळा वाचवायच्या असतील तर १५ मार्च २०२४च्या शासन निर्णयातील पटसंख्या निकष बदलण्याची आवश्यकता आहे. ज्याप्रमाणे इयत्ता नववी ते दहावीसाठी एकत्रित पटसंख्या २० निकष अंशतः बदलला. त्यामुळे जिल्ह्यातील जवळपास ४० शाळांना तात्पुरता दिलासा मिळाला. त्याचप्रमाणे इयत्ता सहावी ते इयत्ता आठवी या वर्गांसाठी पण पटसंख्या निकष बदलण्याची आवश्यकता आहे. यामुळे अनेक शाळेतील इयत्ता सहावी ते इयत्ता आठवी या वर्गातील संभाव्य अतिरिक्त ठरणारे शिक्षक वाचतील. परिणामी, ग्रामीण भागातील शाळांना मोठा दिलासा मिळेल. तसेच अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयामध्ये देखील अतिरिक्त ठरणाऱ्या प्राध्यापकांच्या समायोजनानंतर उर्वरित रिक्त जागांसाठी प्राध्यापक शिक्षक पदासाठी भरती प्रक्रिया पवित्र प्रणालीद्वारे राबवली जाणार आहे. ही भरती प्रक्रिया पारदर्शक व संस्थांना विश्वासात घेऊनच करावी. यासाठी आयोजित बैठकीस रत्नागिरी जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघास निमंत्रित करण्यात यावे असे ठरले.

यावेळी संघाचे उपाध्यक्ष सुधीर दाभोळकर, सचिव सुभाष गुढेकर, कोषाध्यक्ष प्रशांत शिर्के, नवकोकण एज्युकेशन सोसायटी चिपळूणचे अध्यक्ष मंगेश तांबे, लांजा एज्युकेशन सोसायटीचे शंकर सप्रे, नाणार एज्युकेशन सोसायटीचे उल्हास देसाई, देवघरचे डॉ. भाई सकपाळ, तुळसणी एज्युकेशन सोसायटीचे सत्यवान शिंदे, चिपळूण श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे मल्लेश लकेश्री आदी उपस्थित होते.

नाटे रस्त्यावर टाटा सुमो उभी; वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा

राजापूर : पुढारी वृत्तसेवा

नाटे-धारतळे मार्गावरील सार्वजनिक रस्त्यावर वाहन उभे करून वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एका वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० जून २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.५० वाजता नाटे ते धारतळे जाणाऱ्या रस्त्यावर सागवेडी बसस्टॉप परिसरात आरोपी तोफीक अलीसाब भाटकर (वय ४८, रा. वडापेठ, नाटे, ता. राजापूर) यांनी त्यांच्या ताब्यातील टाटा सुमो (क्रमांक MH-46-BL-9046) हे वाहन सार्वजनिक रस्त्यावर उभे केले होते. हे वाहन अशा पद्धतीने उभे करण्यात आल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता तसेच रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या आणि वाहनचालकांच्या सुरक्षेलाही धोका निर्माण झाला होता. याप्रकरणी पोलिस शिपाई दत्तात्रय शिवाजी पाटील (बकल क्र. ४१०, नाटे पोलिस ठाणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफीक भाटकर यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

मंडणगड : सुर्ले मार्गावरील नदीवर असलेल्या नादुरुस्त कॉजवेची पाहणी करताना आमदार प्रमोद जठार, जिल्हाध्यक्ष सतीश मोरे, अजय दळवी, पृथ्वीराज चव्हाण आदी.

सुर्ले मार्गावरील कॉजवेची झाली तत्काळ दुरुस्ती

आमदार प्रमोद जठार यांच्याकडून पाहणी

मंडणगड : पुढारी वृत्तसेवा

तालुक्यातील सुर्ले गावाकडे जाणाऱ्या मार्गावरील नादुरुस्त कॉजवेमुळे हा मार्ग नागरिकांसाठी धोकादायक ठरत होता. या समस्येमुळे सुर्ले, बौद्धवाडी तसेच परिसरातील ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अखेर भाजपचे आमदार प्रमोद जठार यांच्या सूचनेनुसार तातडीने दखल घेत कॉजवेवरील खचलेल्या मार्गाची दुरुस्ती पूर्ण करण्यात आली आहे.

आमदार जठार नुकतेच मंडणगड दौऱ्यावर आले होते. यावेळी सुर्ले गावाकडे जाणाऱ्या मार्गावर निवळी नदीवरील कॉजवेची दुरवस्था झाल्याचे कार्यकर्त्यांनी त्यांच्या निदर्शनास आणले. यावर तत्काळ आ. जठार यांनी संबंधितांना दुरूस्तीसंदर्भात कार्यवाहीच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार या कॉजवेची आठ दिवसांच्या आत दुरूस्ती करण्यात आली आहे. भाजपचे उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष सतीश मोरे, कोकण संयोजक अजय दळवी, तालुकाध्यक्ष दत्ताजी महाडिक, उपाध्यक्ष पृथ्वीराज चव्हाण, सचिन शेठ यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

उत्खनन केलंय; पण माती अन्यत्र वाहतूक केली नाही!

महसूल विभागाचा अजब दावा; कागदी घोडे नाचवण्यात वेळकाढूपणा

दापोली : पुढारी वृत्तसेवा

दापोली तालुक्यातील आसूद गावालगत हर्णे मुख्य मार्गावरील डोंगर खोदकाम प्रकरणात महसूल विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित ठिकाणी उत्खनन करण्यात आले असले तरी खोदकामातून निघालेली माती अन्यत्र वाहतूक करण्यात आलेली नसल्याने संबंधितांवर कारवाई करता येत नसल्याचा दावा महसूल विभागाकडून करण्यात येत आहे. मात्र, दुसरीकडे याच प्रकरणी नोटीस बजावण्यात आल्याने प्रशासनाच्या भूमिकेत विसंगती दिसून येत असून हा केवळ कागदोपत्री कारवाईचा प्रकार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

तालुक्यात विविध ठिकाणी डोंगर व टेकड्यांचे मोठ्या प्रमाणावर उत्खनन होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. मात्र अशा प्रकारांकडे महसूल प्रशासनाकडून वेळोवेळी दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

दापोली : हर्णे मुख्य मार्गावरील खोदलेला डोंगर.

माध्यमांमध्ये वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर किंवा स्थानिकांनी आवाज उठवल्यानंतरच प्रशासन हलते, असा अनुभव असल्याने कारवाईच्या प्रभावीतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

या तालुक्यात अनेक ठिकाणी रिसॉर्ट, हॉटेल तसेच इतर व्यावसायिक प्रकल्पांसाठी डोंगर व उंचवट्यांचे उत्खनन करून भूभाग सपाट केला जात असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. अशा अनियंत्रित उत्खननामुळे पर्यावरणीय समतोल बिघडण्यासह भविष्यात दरडी कोसळणे, मृदा क्षरण व नैसर्गिक आपत्तींचा धोका वाढू शकतो, अशी भीती आहे.

तेव्हा प्रशासनाने केवळ नोटीस देण्यापेक्षा प्रत्यक्ष पाहणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. उत्खनन झाल्याचे मान्य करताना कारवाईसाठी मातीची वाहतूक झाल्याचा निकष लावला जात असल्याने महसूलच्या या अजब तालुकाभर जोरदार चर्चा रंगली आहे.

महावितरणने स्मार्ट मीटरबाबतची हिटलरशाही बंद करावी : मोडक

चिपळूण शहर : पुढारी वृत्तसेवा

महावितरण कंपनीच्या वतीने ग्राहकांना मेसेजद्वारे सूचीत करून ४८ तासांत स्मार्ट मीटर बसविणार, विरोध करणाऱ्यांना दहा हजार रुपये दंड अथवा तीन महिन्यांचा कारावास देणार असे घाबरविले जात आहे. महावितरण कंपनीने जबरदस्तीने दांडगेशाही पद्धतीने काढलेले मीटर बदलीचे फर्मान मागे घ्यावे; अन्यथा महावितरणच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस व वक्ता सेलचे जिल्हाध्यक्ष रफिक मोडक यांनी दिला आहे.

अदानी, अंबानी, मोदी यांच्या फायद्यासाठी १५० कोटी लोकांवर हे सरकार अन्याय करणार का? तामिळनाडूचे मुख्यमंत्री विजय थलपाती यांनी अदानी ग्रुपचे 20,000 कोटींचे स्मार्ट मीटर रद्द केले.

महाराष्ट्र सरकारने या प्रकारची कारवाई करून सर्व स्मार्ट मीटर रद्द करून जनहिताचा निर्णय घ्यावा. मात्रजबरदस्तीने स्मार्ट वीज मीटर बसविण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा रफीक मोडक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

हिंदुत्व म्हणजे मानवतेचा संदेश देणारी जीवनपद्धती

डॉ. उदय निरगुडकर; चिपळुणात 'हिंदुत्व : भारतीयत्वाची व्यापक संकल्पना' विषयावर व्याख्यान

चिपळूण शहर : पुढारी वृत्तसेवा

हिंदुत्व हा केवळ एखाद्या धर्माचा किंवा पंथाचा विषय नाही, तर तो भारतीय संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या परंपरेतून घडलेला जीवन दृष्टिकोन आहे. वसुधैव कुटुंबकम आणि सर्वे भवन्तु सुखिनः यांसारख्या उदात्त विचारांनी जगाला मानवतेचा संदेश देणारी ही जीवनपद्धती आहे. हिंदुत्व म्हणजे सर्वांना सामावून घेणारी, विविधतेचा आदर करणारी आणि प्रत्येक जीवामध्ये परमेश्वराचे अस्तित्व पाहणारी व्यापक विचारधारा होय. त्यामुळे हिंदुत्वाचा पाया प्रेम, सहिष्णुता, करुणा आणि कर्तव्यभावनेवर उभा आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत तथा अभ्यासक डॉ. उदय निरगुडकर यांनी केले.

रत्नागिरी दक्षिण भाजपा जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव यांच्या पुढाकाराने चिपळूण येथील इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्रात 'हिंदुत्व : भारतीयत्वाची व्यापक संकल्पना' या विषयांवर व्याख्यान देताना ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, हिंदुत्व हे किती व्यापक आणि राष्ट्राचा गाभा आहे, हिंदुत्वाची व्याख्या समजू शकले याचे अनेक दाखले दिले. भगवा झेंडा गाडीवर लावून घोषणा देत फिरणे हे हिंदुत्व नव्हे. अफगाणिस्तान, बांगला देश, थायलंड ही सर्व आपली राज्ये होती. इंडोनेशियामध्ये आज ही हिंदूंचे एक स्वतंत्र बेट आहे. आपण हे सर्व विसरलो आहोत.

चिपळूण : डॉ. उदय निरगुडकर यांचा सन्मान करताना भाजप जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव. सोबत चिपळूण नागरी पतसंस्थेच्या सीईओ स्वप्ना यादव, प्रशांत पटवर्धन, डॉ. मीनल ओक आदी.

हिंदुत्वाला चार भिंतीत अडकवून ठेवू नका. आपण काय होतो आपण आणि काय झालो याचा सखोल अभ्यास करा. जगातील श्रीमंत देश नाहीत; पण भारत देशाने, तुम्ही-आम्ही ते विचार ती संकल्पना आणि ती व्याख्या घेऊन पुढे जाण्याचा प्रयत्न करत आहोत, म्हणून या देशात हिंदुत्व संस्कृती व संकल्पना दृढ होत असून आगामी काळात आपण ताकदीने त्याला पुढे नेण्याची गरज असल्याचे डॉ. उदय निरगुडकर म्हणाले.

इतिहासाच्या पानांवर नजर टाकली तर हिंदुत्वाने या राष्ट्राला अनेक संकटांमधून उभारी दिली आहे. परकीय आक्रमणे, सामाजिक आव्हाने आणि सांस्कृतिक संघर्षांच्या काळातही भारतीय समाजाने आपल्या संस्कृतीचे अस्तित्व टिकवून ठेवले. अनेक संत, समाजसुधारक आणि राष्ट्रपुरुषांनी हिंदुत्वाच्या मूल्यांमधून समाजाला एकत्र आणण्याचे कार्य केले. त्यामुळे हिंदुत्व हा इतिहासाचा गौरवशाली वारसा आहे, असे ते म्हणाले.

यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह मंदार लेले, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री उदय चितळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नगर कार्यवाह राजेश सोहनी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे चिपळूण शाखेचे अध्यक्ष प्रशांत पटवर्धन, कार्यवाह डॉ. मीनल ओक, चिपळूणच्या उपनगराध्यक्ष रुपाली दांडेकर, भाजपचे नेते सहदेव बेटकर, वाशिष्ठी डेअरीच्या मुख्य प्रवर्तक तसेच भाजपच्या जिल्हा विशेष निमंत्रित सदस्य स्वप्ना यादव यांच्यासह अनेक मान्यवर, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत यादव यांनी केले.

अवैध धंद्यांवर कारवाईची मागणी

पोलिस अधीक्षकांनी दिले देवरुख पोलिसांना कारवाईचे निर्देश

रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा

संगमेश्वर तालुक्यातील साखरपा-कोंडगाव परिसरात सुरू असलेल्या कथित अवैध धंद्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी ह्युमन राईट असोसिएशन फॉर प्रोटेक्शन या संघटनेने केली आहे. याबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पोलिस अधीक्षकांना निवेदन सादर केले आहे. त्यानंतर पोलिस अधीक्षकांनी देवरुख पोलिसांना आवश्यक कारवाईचे निर्देश दिले.

या निवेदनात म्हटले आहे की, साखरपा-कोंडगाव परिसरातील अवैध धंद्यांमुळे गरीब कुटुंबांचे आर्थिक नुकसान होत असून अनेक तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. त्यामुळे यावर तातडीने कारवाई करून हे प्रकार बंद करावेत.

संघटनेचे राज्य सचिव बाळकृष्ण वनकर, शंकर लाड यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी पोलिस अधीक्षकांची प्रत्यक्ष भेट घेऊन या विषयावर चर्चा केली. यावेळी पोलिस अधीक्षकांनी निवेदनाची दखल घेत संबंधित प्रकरणात योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले. दरम्यान, या पार्श्वभूमीवर देवरुख पोलिसांना आवश्यक चौकशी व कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

सहकुटुंब पहावे असे तुफान विनोदी नाटक पुन्हा कोल्हापूरमध्ये!

उद्या मंगळ.दि.२३
सायं.६ वा.
गोविंदराव टेंबे रंगमंदिर
देवल क्लब,कोल्हापूर
तिकीट विक्री देवल क्लब येथे सुरु
फोन बुकिंग : 9561626663
Online Booking : book my show
आणि ticketalay
संपर्क : महाजन पब्लिसिटी 9561626666

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
A GOVT. OF INDIA UNDERTAKING
एक परिवार एक बैंक

मालमत्ता वसुली शाखा : नवी मुंबई दुकान क्र. जी-९ आणि १०, लोकमान्य टिळक, शॉपिंग सेंटर, प्लॉट क्र. ८, सेक्टर-१ वाशी, नवी मुंबई-४००७०३ ई-मेल : brmgr2259@mahabank.co.in, bom2259@mahabank.co.in/
दूरध्वनी - ०२२-२०८७५५०३

स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना (परिशिष्ट ४-ए)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२च्या नियम ८(६) आणि नियम ९(१)च्या तरतुदींसह सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या ई-लिलाव विक्रीसाठी सूचना

सर्वसामान्यपणे लोकांना आणि विशेषत: कर्जदार आणि जामीनदार यांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली स्थावर आणि जंगम मालमत्ता जी बँक ऑफ महाराष्ट्र यांच्याकडे गहाण/चार्ज्ड करण्यात आली असून, बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी यांच्या ताब्यात असून त्यांची **''जसे आहे जिथे आहे'', ''जे आहे ते आहे'', आणि ''तेथे जे असेल ते'' या आधारे १०/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० दरम्यान कर्जदार आणि जामीनदार यांच्याकडून** तक्त्यात नमूद केलेली बँक ऑफ महाराष्ट्रला देणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी होणार आहे. कर्जदार आणि जामीनदार, थकबाकीचे तपशील आणि स्थावर मालमत्तेचे थोडक्यात वर्णन आणि त्यावरील माहित असलेल्या भाराचे, ताबा प्रकार, राखीव किंमत आणि बयाणा रक्कम यांचे तपशील खालीलप्रमाणे-

शाखा	कर्जदार	जामीनदार	माहित असलेल्या भारासहीत स्थावर मालमत्तेचा तपशील	ताबा प्रकार	मागणी सूचनेनुसार थकबाकीची रक्कम	राखीव किंमत (रु. मध्ये)
एआरबी नवी मुंबइ	**मे. दीपक ॲग्रीफ्रेश प्रायव्हेट लिमिटेड, संचालक-१. श्री. दीपक एकनाथ मोळे, २. श्री. गणेश विष्णू साळवी** पत्ता - ऑफीस क्र. ४१४,४१५ प्लॉट क्र. २/३/४, कमोडीटी एक्स्चेंज इमारत, युनियन बँकेशेजारी, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई-४००७०३	**श्री. दीपक एकनाथ मोळे,** पत्ता- फ्लॅट क्र. १७०२, सनशाईन गाव, डी मार्टजवळ, सेक्टर ८, घणसोली, नवी मुंबई, महाराष्ट्र-४००७०१ **श्री. गणेश विष्णू साळवी,** पत्ता - फ्लॅट क्र. ८०१, सेलिब्रेशन सीएचएस लि., प्लॉट क्र. २३, सेक्टर क्र. ६ आणि सेक्टर ८, ऐरोली, नवी मुंबई, महाराष्ट्र-४००७०१ **श्रीमती सिद्धी गणेश साळवी,** पत्ता - फ्लॅट क्र. ८०१, सेलिब्रेशन सीएचएस लि., प्लॉट क्र. २३, सेक्टर क्र. ६ आणि सेक्टर ८, ऐरोली, नवी मुंबई, महाराष्ट्र-४००७०१	घर क्र. २२९, जी. क्र. ८६ एच. क्र. ४/१, श्री राम कृपा बंगल्यासमोर, दुर्गा देवी मंदीराजवळ, दुर्गादेवी रोड, गाव मौजे वरचा पाट, मु.पो. आणि तालुका-गुहागर, जि-रत्नागिरी, महाराष्ट्र पिन-४१५७०३	प्रतिकात्मक	रू.३,८३,९५,४७८.६/- (रूपये तीन कोटी त्र्याऐंशी लाख पंच्याण्णव हजार चारशे अठ्ठ्याहत्तर आणि साठ पैसे फक्त) अधिक एनपीए दिनांक २९/१०/२०२३ पासूनचे १२.२०% टक्के दराने लागू न झालेले व्याज आणि दंडात्मक व्याज २% दराने अधिक मुदत संपण्याच्या दिनांकापर्यंतचे चार्जेस, मूल्य आणि इतर खर्च	१६६९४०००

बयाणा रक्कम राखीव मूल्याच्या १०%
पाहणीचा दिनांक : ०३.०७.२०२६,
संपर्क तपशील: - श्री मनमोहन मुर्मू, शाखा व्यवस्थापक, एआरबी शाखा-९५५२८०८१८५, श्रीमती सानिया खोब्रागडे, व्यवस्थापक एआरबी ९०४९३७६४४३
विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया बँकेच्या वेबसाईटवर दिलेल्या https://www.bankofmaharashtra.in/propsale.asp या लिंकचा आणि **ई-बिक्रय पोर्टल (www.baanknet.com)** चा संदर्भ घ्यावा.

तारीख : २१.०६.२०२६
ठिकाण : नवी मुंबई

अधिकृत अधिकारी,
बँक ऑफ महाराष्ट्र, नवी मुंबई क्षेत्र